डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

# कृषि विज्ञान केंद्र

सेलसुरा ता.जि.वर्धा - ४४२१०१ (महाराष्ट्र)

भाकृअनुप ICAR

डॉ.जिवन रा. कतोरे
वरीष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख

फोन -८२७५४१२०१२
Email – kvkselsura@pdkv.ac.in / kvk.wardha@gmail.com

जा.क्र.कृविके/सेलसुरा/492 / २०२२ दिनांक २८/०७/२०२२

प्रती,
........................................
........................................
........................................

विषय :- सन २०२२-२३ मध्ये कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा जि.वर्धा अंतर्गत प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम, पशु रखवाली / चराई, फळबाग संबंधीत कामे व इतर शेती विषयक कामे कंत्राट पध्दतीने करण्याकरीता वैध परवानाधारक कंत्राटदाराकडून मजुरांचे (स्त्री / पुरूष) निविदा दर (कोटेशन) बोलविणेबाबत...

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा जि.वर्धा येथील बिजोत्पादन कार्यक्रम, पशु रखवाली / चराई, फळबाग संबंधीत कामे व इतर शेती विषयक कामे कंत्राट पध्दतीने करण्याकरीता वैध परवानाधारक कंत्राटदाराकडून मजुरांचे (स्त्री / पुरूष) निविदा दर (कोटेशन) खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून मागविण्यात येत असुन निविदा मसुदा / निविदेचे स्वरूप सोबत जोडण्यात आलेले आहे.

सहपत्र - वरीलप्रमाणे

वरीष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख
कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा जि.वर्धा

वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख
कृषी विज्ञान केंद्र,सेलसुरा
जि.वर्धा

# निविदा (कोटेशन) मसुदा

डॉ.पंदेकृवि, अकोला अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा जि.वर्धा येथील प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम, पशु रखवाली / चराई, फळबाग संबंधीत कामे व इतर शेती विषयक कामे कंत्राट पध्दतीने करण्याकरीता दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कामाचा तपशील | | तपशील | दर (रू.) |
|---|---|---|---|---|
| १ | बकऱ्या, गायी, बैल इत्यादी जनावरांची देखरेख (प्रक्षेत्रावर चारणे, चारा तयार करणे, रात्री व दिवसा चारा व पाणी करणे, जनावरांची काळजी घेणे, गोठे साफसफाई) | | | |
| २ | शेळी व मेंढी देखरेख (प्रक्षेत्रावर चारणे, चारा पाणी करणे, निवारा साफसफाई, करडांना दुध पाजणे व काळजी घेणे) | | | |
| ३ | कुक्कुटपालन देखरेख (दाणा पाणी करणे, अंडी गोळा करणे, राखण करणे, कुक्कुटपालन व गृह साफसफाई, भांडे स्वच्छ करणे इ.) | | | |
| ४ | रात्रपाळी चौकीदारी करणे प्रक्षेत्र / कार्यालय | | | |
| ५ | पिकातील विरळणी करणे | | प्रती हे. | |
| ६ | बियाणे टोकन करणे | | प्रती हे. | |
| ७ | पिकांना फळबागांना पाणी देणे | दांड पध्दत | प्रती हे. | |
| | | स्प्रिंकलर | प्रती हे. | |
| ८ | पिकांची कापणी, मळणी व गंजी लावणे | | प्रती हे. | |
| ९ | शेतातील धसकटे व काडीकचरा वेचणे | | प्रती हे. | |
| १० | पिकांचे, फळझाडांचे इं.संरक्षण करणे / पहारेकरी | | प्रती हे. | |
| ११ | पिकातील डवरणी व वखरणी करणे | | प्रती हे. | |
| १२ | पाठीवरच्या पंपाने फवारणी करणे | | प्रती हे. | |
| १३ | फळबाग निगडीत दैनंदिन कामे | | प्रती हे. | |
| १४ | शेतीशी निगडीत दैनंदिन कामे | | प्रती हे. | |
| १५ | भांडार विभागातील कामे | | प्रती हे. | |
| १६ | उत्पादित मालाचे वजन करणे | | प्रती हे. | |
| १७ | उत्पादीत माल दळणवळण करण्याकरीता मालाचे लोडींग व अनलोडींग करणे | | प्रती हे. | |
| १८ | बीज प्रक्रिया केंद्राची कामे (टॅगिंग / बॅगिंग) | | प्रती हे. | |
| १९ | फळबाग रोपांच्या नर्सरीकरीता धसकटे वेचणे, जमिन भुसभुसीत करणे, नर्सरी टाकणे | | प्रती हे. | |
| २० | उत्पादित मालाची थ्रेशरव्दारे मळणी करणे, पोते भरणे, वजन करणे, शिलाई मारणे, व गोडावून ला आणून थप्पी मारणे | | प्रती क्विंटल | |
| २१ | निंदन करणे | | प्रती हे. | |
| २२ | पेरणी यंत्राव्दारे पेरणी करणे | | प्रती हे. | |
| २३ | वखरणी / डवरणी (बैलजोडीव्दारे ) | | प्रती हे. | |

अटी व शर्ती :-

१) निविदा पत्रक / कोटेशन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.३० यावेळेत स्विकारले जातील.

२) निविदा पत्रक वरीष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख, कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा जि.वर्धा यांचे नावाने सिलबंद लिफाफ्यामध्ये पाठवावेत.

३) कंत्राटदाराकडे संबंधीत कामाचा वैध परवाना असणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराला परवाना संबंधीत इतर सर्व आवश्यक कागदपत्रे या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

४) कंत्राटदारास मिळालेल्या कामाच्या देयकाचे १० टक्के रक्कम सुरक्षाठेव (Security Deposit) म्हणून संबंधीत विभागाकडे जमा करावी लागेल व काम पूर्ण झाल्यावर सुरक्षा ठेव परत मिळण्याकरीता कार्यालय प्रमुख यांचे नावे अर्ज सादर करावा लागेल त्यानंतर सुरक्षा ठेव परत करण्यात येईल.

५) कंत्राट पध्दतीने प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधीत कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्री / पुरूष मजुरांचे व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी संबंधीत कंत्राटदाराची राहील.

६) कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा जि.वर्धा कार्यालया अंतर्गत संपूर्ण प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधीत कामे करीत असतांना पिकांचे / फळबागांचे नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधीत कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येईल.

७) प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधीत कामे करतेवेळी कुठलीही दुर्घटना / अपघात / जिवीतहानी झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी / अधिकारी किंवा विद्यापीठ प्रशासन जबाबदार राहणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

८) आपणास प्रक्षेत्र / जनावरे / कार्यालय / प्रयोगशाळा संबंधीत कामे पूर्ण करण्यात यावे. कामाबाबत विभागावरून तक्रार आल्यास किंवा काम अर्धवट राहील्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.

९) विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशीत केलेल्या नियमांचे पालन करणे संबंधीत कंत्राटदाराला बंधनकारक राहील.

१०) कंत्राटदारांनी देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहीती सादर करावी. अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.

११) या कार्यालयातर्फे कंत्राटदारास प्रक्षेत्र / जनावरे / कार्यालय / प्रयोगशाळा संबंधीत कामे करीत असतांना कोणतेही साहीत्य पुरविण्यात येणार नाही. सदर कामे करण्याकरीता आवश्यक साहीत्य उपलब्ध करून देण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१२) कंत्राटदारास बिजोत्पादन प्रक्षेत्र / फळबाग / जनावरे / माती परीक्षण प्रयोगशाळा / कुक्कुटपालन / जैविक खते उत्पादन प्रयोगशाळा संबंधीत कामाचे देयक काम पूर्ण व विहीत वेळेत केल्यावर तसेच संबंधीत विभागाचे अधिकारी यांनी काम समाधानकारक झाल्याचे प्रमाणीत केल्यानंतर कामाचे देयक पारीत करण्यात येईल.

१३) प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन प्रक्षेत्र / फळबाग / जनावरे / माती परीक्षण प्रयोगशाळा / कुक्कुटपालन / जैविक खते उत्पादन प्रयोगशाळा संबंधीत वापरण्यात येणाऱ्या स्त्री / पुरूष मजुरांना कामगार (Labour Act) कायद्यानुसार किमान वेतन, विमा संरक्षण, भविष्य निर्वाह निधी देणे, कॅशलेस पध्दतीचा अवलंब करणे तसेच सर्व प्रकारचे करांचा नियामाने व नियमीत भरणा करणे इत्यादी संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१४) प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन प्रक्षेत्र / फळबाग / जनावरे / माती परीक्षण प्रयोगशाळा / कुक्कुटपालन / जैविक खते उत्पादन प्रयोगशाळा संबंधीत कामे करीत असतांना कोणताही वाद निर्माण झाल्यास सदर वाद-विवाद वरीष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख, कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा जि.वर्धा यांचे समक्ष मिटवीला जाईल व अंतीम निर्णय वरीष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख, कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा जि.वर्धा यांचा राहील आणी तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.

१५) प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन प्रक्षेत्र / फळबाग / जनावरे / माती परीक्षण प्रयोगशाळा / कुक्कुटपालन / जैविक खते उत्पादन प्रयोगशाळा संबंधीत कामे ही एक वर्षामधील खरीप, रब्बी व उन्हाळी या तिन्ही हंगामाकरीता असुन कामाचे दर एक वर्षाकरीता वैध राहतील.

१५) प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन प्रक्षेत्र / फळबाग / जनावरे / माती परीक्षण प्रयोगशाळा / कुक्कुटपालन / जैविक खते उत्पादन प्रयोगशाळा संबंधीत कामे ही एक वर्षामधील खरीप, रब्बी व उन्हाळी या तिन्ही हंगामाकरीता असुन कामाचे दर एक वर्षाकरीता वैध राहतील.

१६) सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे व संपूर्ण जबाबदारी कंत्राटदारांची असल्याचे रू.१०० चे स्टॅम्प पेपरवर करारनामा सादर करणे संबंधीत कंत्राटदारास बंधनकारक राहील.

१७) निविदा / कोटेशन मधील संबंधीत कामे कंत्राट पध्दतीने करण्याचे दर नियमाप्रमाणे सर्व करांसहीत नमुद करण्यात यावेत तसेच त्या कराचा विहीत मुदतीमध्ये भरणा करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत निविदा धारकाची राहील. करा संबधीत कोणतीही तक्रार आल्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

१८) निविदाचा काही भाग किंवा संपूर्ण निविदा स्विकारण्याचा व नाकारण्याचा अधिकार कार्यालय प्रमुखास राहील.

१९) कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा जि.वर्धा अंतर्गत प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम / फळबाग / जनावरे / माती परीक्षण प्रयोगशाळा / कुक्कुटपालन / जैविक खते उत्पादन प्रयोगशाळा संबंधीत कामे तसेच वाहन विभाग तांत्रीक कामे करण्यासाठी पुरविण्यात आलेले कंत्राटी कर्मचारी हे १८ वर्षाच्या वर असावे तसेच ६० वर्षापेक्षा कमी असावे व त्यास कोणत्याही प्रकारचे अपंगत्व नसुन ते शारीरिकदृष्ट्या सक्षम असावेत.

२०) कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा जि.वर्धा अंतर्गत प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम / फळबाग / जनावरे / माती परीक्षण प्रयोगशाळा / कुक्कुटपालन / जैविक खते उत्पादन प्रयोगशाळा संबंधीत कामे करण्यासाठी पुरविण्यात आलेले कंत्राटी कर्मचारी यांचेकडे तांत्रीक कामाची पदवीका/ आय टी आय प्रमाणपत्र / वाहन चालविण्याचा परवाना व प्रक्षेत्र कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

२१) पुरवठा धारकाचे मजूर पूर्णत : कंत्राटी पध्दतीने असतील त्यात विद्यापीठ प्रशासनाचा कोणताही संबंध कामावर ठेवण्याबाबत राहणार नाही. मजुरांची कुठल्याही प्रकारची कामावर असल्याची जेष्ठता यादी कार्यालयामार्फत देण्यात येणार नाही.

२२) कामाच्या आवश्यकतेनुसार मजुर उपलब्ध करून द्यावे लागतील.

२३) मजुरांची कामाची वेळ ही आठ तास ठरवून दिल्या प्रमाणे राहील.

२४) सदर संस्था / कंपनी / ठेकेदार असमाधानकारक काम करत असेल तर सदर संस्थेचे कंत्राट कोणत्याही क्षणी रद्द करण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीकर्त्याकडे राखील असतील.

२५) सदर कामाबाबतचे देयक सादर करण्याची जबाबदारी कंत्राटदार संस्थेची राहील.

२६) वरील प्रमाणे अटी व शर्तीच्या अधीन राहून सोबत जोडलेल्या निविदा मसुदा तपशीला नुसार दि.४/८/२०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेत निविदा सिलबंद लिफाफ्यामध्ये सादर करावी.

वरीष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख
कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा जि.वर्धा